राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गतच्या प्रकल्पासाठी एकूण २.५% शुल्क (आस्थापना शुल्क व सोईसुविधा शुल्क) आकारण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र. संकिर्ण-०१/२०१८/प्र.क्र.११/अ-२
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ०४ एप्रिल, २०१८.

संदर्भ :- १) शासन अधिसूचना क्र.एलक्युएन-१२/२०१३/प्र.क्र.१९०/अ-२, दि.१९.०३.२०१४
२) Ministry of Road Transport and Highways ,नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एमएच-११०११/ ३०/२०१५.एलए, २८.१२.२०१७

प्रस्तावना:-

नवीन भूसंपादन कायदा, २०१३ मधील कलम ३(i)(vi) येथील आस्थापना शुल्काबाबत दिलेल्या संज्ञेनुसार शासन अधिसूचना,दि.१९.०३.२०१४ अन्वये ३% आस्थापना शुल्क व ३% सोईसुविधा शुल्क हे लागू करण्यात आलेले आहेत. केंद्र शासनाच्या संदर्भाधीन क्र.२, दि.२८.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गतच्या प्रकल्पांसाठी एकूण २.५% एवढे शुल्क (आस्थापना शुल्क व सोईसुविधा शुल्क) आकारण्याबाबत सूचित केले आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने सादर केलेला प्रस्ताव व केंद्र शासनाच्या संदर्भाधीन क्र.२, दि.२८.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेता, राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ च्या अंतर्गतच्या प्रकल्पांसाठी एकूण २.५% एवढे शुल्क (आस्थापना शुल्क व सोईसुविधा शुल्क) आकारण्याबाबची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

नवीन भूसंपादन कायदा, २०१३ मधील तरतूदीनुसार शासन अधिसूचना दि.१९.०३.२०१४ अन्वये ३% आस्थापना शुल्क व ३% सोईसुविधा शुल्क लागू करण्यात आलेले आहे. तथापि, फक्त राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गतच्या प्रकल्पांसाठी १.५% आस्थापना शुल्क व १.०% सोईसुविधा शुल्क असे एकत्रितरित्या एकूण २.५% एवढे शुल्क आकारण्यात यावे.

सोईसुविधा शुल्कापोटी जमा होणारी १.०% रक्कम ही ईटीएस, कत्रांटी मोजणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांकरीता व भूसंपादनाशी निगडीत कार्यालयीन खर्चासाठी वापरण्यात यावी.

सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४६/साधनसंपत्ती, दि.२३.०३.२०१८ रोजी दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०४०४१७०६०६६३१९ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Rajendra Narayan Pimpale

Digitally signed by Rajendra Narayan Pimpale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2035e3a0bddb0bf614404e90ab41bc73e05b7120d9a7b3314f072bc7a31fca9c, cn=Rajendra Narayan Pimpale
Date: 2018.04.04 17:08:29 +05'30'

(राजेंद्र ना. पिंपळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे अ.मु.स. मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
३) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.मंत्री (वित्त व वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) सर्व जिल्हाधिकारी
१५) संचालक, नगर रचना, पुणे
१६) प्रादेशिक अधिकारी, मुंबई, महाराष्ट्र,भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रादेशिक कार्यालय, नवी मुंबई
१७) प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नागपूर प्रादेशिक कार्यालय, नागपूर
१८) निवडनस्ती (अ-२)